# जुगार

ना. सी. फडके

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**जुगार : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ ३६०/-

# जुगार

# १

चारुलतेनं दार उघडलं.

दाराबाहेर उभी राहिलेली व्यक्ती म्हणाली, ‘साप्ताहिक कलारंजन’साठी मुलाखत देण्याचं आपण मान्य केलं आहे. वेळही दिली आहे, त्याप्रमाणे आपली मुलाखत घेण्यासाठी मी आलो आहे.

त्या व्यक्तीकडे बघून चारुलतेला आश्चर्य वाटलं.

‘कलारंजन’च्या संपादकानी काल फोनवरून तिला विचारलं होतं. येत्या रविवारी तुमच्या वडिलांच्या सत्काराची जाहीर सभा होणार आहे. त्या निमित्तानं आमच्या ‘कलारंजन’चा खास अंक काढण्याचं आम्ही योजिलं आहे, तुमचे वडील नंदलाल सारंग यांची एक प्रतिभासंपन्न चित्रकार म्हणून आजपर्यंत स्वदेशात मोठी ख्याती होती. परंतु आता त्यांच्या चित्रकृतीचा शिकागो येथे जागतिक प्रदर्शनात अपूर्व गौरव झाल्यामुळे नंदलाल सारंग हे विश्वविख्यात झाले आहेत. त्यांच्या गौरवासाठी जो खास अंक आम्ही काढीत आहोत त्यात मोठ्या मोठ्या लेखकांचे लेख आम्ही मिळविले आहेत. ‘जे.जे. स्कूल ऑफ आर्ट’च्या प्राचार्यांनी मोठा मार्मिक आणि सुंदर लेख दिला आहे. या अंकासाठी तुमची मुलाखत हवी आहे. तुमच्या मुलाखतीला काही एक वेगळं महत्त्व आहे. नंदलाल सारंग यांच्या कलेविषयी तज्ज्ञ लोकाना काय वाटतं ते समजून घेण्यासाठी लोक जसे उत्सुक आहेत, त्याप्रमाणेच या असामान्य चित्रकाराच्या एकुलत्या एक कन्येला त्यांच्याबद्दल काय वाटतं हेदेखील समजून घेण्याची उत्सुकता लोकाना साहजिकच वाटते. एक कलाकार म्हणून नंदलाल

यांचे गुणविशेष जसे आहेत त्याचप्रमाणे एक संसारी गृहस्थ म्हणून तुमच्या वडिलांचे काही गुण विशेष असणारच. त्यावर प्रकाश टाकणारा लेख तुमच्याकडून मिळविण्याचं आम्ही ठरविलं आहे. हा लेख लिहिण्याचा अधिकार फक्त तुम्हालाच आहे. तुम्ही जितक्या जवळून या त्रिखंड कीर्तीच्या कलाकाराला बघितलं आहे, तितक्या जवळून दुसऱ्या कुणीच बघितलं नाही, म्हणून आमची तुम्हाला आग्रहाची विनंती आहे की तुम्ही मुलाखत द्यावी. तुमच्या वडिलांबद्दल तुम्हाला काय वाटतं, त्यांची दिनचर्या काय आहे, त्यांच्या आवडी-निवडी कोणत्या आहेत, अशा कही प्रश्नांची उत्तरं तुमच्याकडून मिळाली तर आमच्या वाचकाना ती खचितच आवडतील. तुमच्या वडिलांसारख्या प्रसिद्धीच्या आणि लोकप्रियतेच्या झगमगाटात असणाऱ्या कलावंताच्या खाजगी वैयक्तिक आयुष्यात डोकावून पाहण्याची लोकांची साहजिकच इच्छा असते. तुमच्या मुलाखतीनं लोकांची ही इच्छा काही अंशानं पुरी होईल... चारुलतेनं संपादकांची विनंती मान्य केली होती. वेळ आणि दिवसही दिला होता... त्याप्रमाणे 'कलारंजन' साप्ताहिकाचे प्रतिनिधी तिच्या मुलाखतीसाठी आले होते-

चारुलतेला आश्चर्य वाटलं ते 'कलारंजन'चे प्रतिनिधी आले याचं नव्हे, तर 'तुमच्या मुलाखतीसाठी मी आलो आहे.' असं जी व्यक्ती म्हणत होती त्या व्यक्तीचं!

तिनं साहजिकच तर्क केला होता की तिची मुलाखत घेण्यासाठी येणारा 'कलारंजन'चा प्रतिनिधी म्हणजे कॉलेजातून नुकताच बाहेर पडलेला, वृत्तपत्राच्या कचेरीत उमेदवारी करणारा, चालू फॅशनप्रमाणे तंग बाह्यांची पँट आणि टेरिलिनचा बुशकोट घालणारा एखादा पोरसवदा तरुण असेल... पण आता दाराबाहेर उभ्या असलेल्या व्यक्तीकडे तिनं पाहिलं, तो कमरेला धोतर, अंगात साध्या पांढऱ्या सुती कापडाचा घरधुलाईचा सदरा, वर सुती कापडाचाच लांडा कोट, तासलेल्या डोक्यावर हिंदू महासभेची निशाणी भगवी टोपी, आणि काळ्या पांढऱ्या झुपकेदार मिशा, अशा अवतारात मध्यम वयाचे एक गृहस्थ तिला नमस्कार करीत होते...! आपल्यासारख्या तरुण सुशिक्षित मुलीची मुलाखत घेण्याच्या कामगिरीवर अशा सनातनी बोंगळ वेषातल्या मिशाळ पोक्त गृहस्थांची योजना 'कलारंजन'च्या संपादकांनी केलेली बघून तिचा थोडासा विरस झाला. तिला आश्चर्याचा लहानसा धक्का बसला.

मात्र तिनं आपलं आश्चर्य आपल्या चर्येवर प्रगट होऊ दिलं नाही. 'या या' असं म्हणून तिनं दार पुरतं उघडलं. तिच्या मागं ते गृहस्थ बैठकीच्या खोलीत प्रविष्ट



झाले. एक खुर्ची दाखवून तिनं 'बसा' म्हटलं. ते बसले. त्यांच्या कपाळावरच्या आडव्या गंधाकडे तिचं लक्ष गेलं. ती मनाशी म्हणाली, सनातनीपणाची ही आणखी एक निशाणी, ...ते म्हणाले, 'माझं नाव नानाराव लोटलीकर'...'नानासाहेब' हा शब्द अधिक चांगला असूनही 'नानाराव' म्हणणारे हे गृहस्थ वीर सावरकरांचे अनुयायी असले पाहिजेत. आता मात्र तिला जे हसू आलं ते चर्येवर न दाखवणं तिला जमलं नाही. तिच्या हसण्याच्या खऱ्या कारणाचा नानारावाना संशय आला नाही. त्यांना वाटलं तिच्या तोंडावरचं हसू आपल्या स्वागतासाठीच असावं... जागतिक कीर्तीच्या एका कलावंताच्या तरुण मुलीनं असं गोड हसून आपलं स्वागत करावं हे बघून नानाराव बहुत खूष झाले...

तितक्यात त्यांच्या लक्षात आलं की त्या बैठकीच्या खोलीत आणखी कुणीतरी आधीच बसलेलं आहे. त्यांच्या मुद्रेवर प्रगट झालेलं आश्चर्य बघून चारुलता त्याना म्हणाली, 'तुमचा याचा परिचय करून देते हं.'

खुर्चीवर बसलेल्या तरुणाकडे हात दाखवून तीम्हणाली, 'यांचं नाव 'मन्मथ कौशिक'. 'चँपियन' नावाचं इंग्रजी दैनिक तुम्हाला ठाऊक आहे. त्या दैनिकात मुख्य उपसंपादकाचं काम पाहतात हे. इंग्रजी वृत्तपत्र व्यवसायातले एक उदयोन्मुख अग्रगण्य लेखक म्हणून यांनी अल्प वयात मोठा लौकिक मिळविला आहे. वृत्तपत्रीय व्यवसायाचं खास शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला जाण्याची शिष्यवृत्ती यांना मिळाली आहे.-'

तिला अडविण्यासाठी उजवा हात उंच करून मन्मथ म्हणाला, 'अहो मिळाली कुठली, मिळविण्याची खटपट चालू आहे म्हणा-'

चारुलता हसली आणि म्हणाली, 'खटपट चालू आहे काय आणि शिष्यवृत्ती मिळाली आहे काय दोन्ही एकच. तुमच्यासारख्याला नाही मिळायची शिष्यवृत्ती तर दुसऱ्या कोणाला?'

तिच्या बोलण्यावर खूष झाल्याप्रमाणे चर्या करून नानाराव म्हणाले, 'बरोबर आहे, रास्त आहे.'

चारुलता म्हणाली, 'शिष्यवृत्ती तुम्हाला मिळाल्यासारखीच आहे. आता फक्त तुमच्याकडून पार्टी मिळायची राहिली आहे.'

'बरोबर आहे. रास्त आहे !' असा उद्‌गार काढून नानाराव खो खो हसू लागले. मग ते मन्मथला म्हणाले, 'तुमचं मन:पूर्वक अभिनंदन करतो.'

चारुलता नानारावांकडे बघून म्हणाली, 'मन्मथ कौशिक आमच्या पपांचे मोठे अभिमानी व चाहते आहेत–'

नानाराव म्हणाले, 'अहो तुमच्या पपांचे अभिमानी आणि चाहते सारं जगच आहे'

चारुलतेनं मन्मथकडे वळून बघितलं. 'मोठी पटाईत दिसते आहे स्वारी गोड बोलण्यात' अशा अर्थाची नेत्रपल्लवी मन्मथनं केली.

चारुलता नानारावांकडे वळून सांगू लागली, 'इलस्ट्रेटेड वीकली'च्या ताज्या अंकात यानी आमच्या पपांचं अभिनंदन करण्यासाठी एक सुंदर लेख लिहिला आहे. तो फार गाजला आहे. वाचला नसलात तर वाचा तुम्ही. त्या लेखात पपांच्या चित्रकलेची मोठी मार्मिक तारीफ तर केलीच आहे मन्मथनी, पण शिवाय त्यानी असं म्हटलं आहे की, शिकागो येथील जागतिक प्रदर्शनात आपलं कलानैपुण्य गाजवून भारताचा तिरंगी झेंडा उंच फडकविणारा हा असामान्य चित्रकार म्हणजे भारताचा अमेरिकेतील ॲम्बॅसडॉरच म्हटला पाहिजे !

नानारावानी हसत हसत आपला ठरावीक उद्‌गार काढला, 'बरोबर आहे, रास्त आहे !' आपले दोन्ही हात पुढे करून मन्मथला म्हणाले, 'एक डझनभर राजदूत अमेरिकेत आले तरी त्यांच्याकडून भारतीय जनतेबद्दलच्या ज्या सद्‌भावना अमेरिकन लोकात निर्माण होणार नाहीत त्या निर्माण करण्याचं अपूर्व काम नंदलाल सारंग यांनी केलं आहे, यात शंका कसली !' असं म्हणताना नानारावांनी आपल्या काळ्या पांढऱ्या मिशा कुरवाळल्यासारखं केलं.

चारुलता म्हणाली, 'मन्मथनी लिहिलं आहे की असा रंगदार राजदूत (Colourful Ambassador) भारतातर्फे पूर्वी कधी अमेरिकेला गेला नव्हता–'

नानाराव उद्‌गारले, 'वाहवा वाहवा. बरोबर आहे, रास्त आहे.'

मन्मथ काहीतरी बोलणार होता, परंतु एकदम भानावर आल्याप्रमाणे नानारावांनी चर्या केली आणि ते म्हणाले, 'पण माझ्या येण्यामुळे तुमच्या दोघांच्या कामात मी व्यत्यय तर आणला नाही ना ?'

मन्मथ म्हणाला, 'छे छे, व्यत्यय कसला ? आमचं काही काम चाललं नव्हतं आणि शिवाय चारुताईची जी मुलाखत तुम्ही घेणार आहात ती तुमची परवानगी असेल तर ऐकण्याची उत्सुकता आहे मला. मोठ्या आनंदानं बसतो मी.'



खिशातून एक कागद काढीत नानाराव चारुलतेला म्हणाले, 'जे प्रश्न मी तुम्हाला विचारणार आहे त्यांचं टिपण करून आणलं आहे मी. ते तुम्ही आधी वाचलंत तर बरं होईल.'

त्यानी पुढे केलेले कागद चारुलतेनं घेतला. प्रश्नावर नजर फिरवली आणि तो परत त्यांचेकडे दिला.

त्यानी विचारलं, 'कसे काय आहेत प्रश्न ?'

नानारावानी टिपणात लिहिलेले प्रश्न तिला काही फारसे हुशारीचे वाटले नव्हते, असल्या मुलाखतीत ठरावीकपणे विचारले जाणारे प्रश्न असतात तेच होते त्या टिपणात... परंतु नानारावांसारख्या वयानं मोठ्या असलेल्या माणसाचा ज्यायोगे अपमान होईल असं काही बोलणं तिला युक्त वाटलं नाही. तोंडावर हसू आणून ती म्हणाली,

'चांगले आहेत प्रश्न.'

तिनं सहजगत्या मन्मथकडे बघितलं. जणू तिच्या मनातला खरा विचार त्यानं ओळखला होता, अशा अर्थानं तो हसला... तीही फक्त त्याच्यासाठी हसल्याप्रमाणे हसली.

नानाराव तिला म्हणाले, 'आता मी एकेक प्रश्न पुन्हा वाचून दाखवतो, जे उत्तर तुम्ही द्याल ते लिहून घेतो.'

त्यानी पिशवीतून कागदाचं पॅड काढलं, पेन्सिल सरसावली, आणि तिचं उत्तर लिहून घेण्यासाठी सरसावल्यासारखं त्यांनी केलं... मुलाखत सुरू झाली... मन्मथ तिची उत्तरं उत्सुकतेनं ऐकू लागला, तिच्याकडे मोठ्या कौतुकानं बघू लागला... तिचा आणि त्याचा ज्या प्रसंगी प्रथम परिचय झाला तो त्याला आठवला...

वकीलमंडळीनी 'बार असोसिएशनच'चं वार्षिक संमेलन साजरं केलं होतं... दुपारी भोजनाचा बेत केला होता व रात्री केसरबाईच्या गायनाचा कार्यक्रम ठेवला होता. भाऊसाहेब सोमण नावाच्या एका ज्येष्ठ वकिलांचा मुलगा नंदू त्याचा मित्र होता. त्याच्या आग्रहाच्या आमंत्रणावरून मन्मथ दोन्ही कार्यक्रमाना हजर राहिला होता. रात्रीच्या बैठकीला अनेक वकिलांनी पाहुणे आणले होते. बैठकीचा हॉल तुडुंब भरून गेला होता. केसरबाईंची मोठीच ख्याती होती. अलीकडे त्या गाण्याचं

आमंत्रण सहसा स्वीकारत नसत. पण मोठमोठ्या वकिलानी त्यांना आग्रह केला होता. त्यांनी आमंत्रण स्वीकारलं होतं. केसरबाईचं गायन फार दिवसात लोकांना ऐकायला मिळालं नव्हतं. त्यामुळे बैठकीला खूपच गर्दी झाली होती... गाणं संपलं तेव्हा पहाटेचे दोन चार वाजले होते... गायन आटोपल्यावर नंदू मन्मथला म्हणाला होता, 'आमचे भाऊ मागाहून सावकाश येणार आहेत. मात्र चारुलतेला 'लिफ्ट' द्यायचा आहे.' मन्मथनं त्याला विचारलं होतं, 'कोण चारुलता ?' नंदू म्हणाला होता, 'अरे तुझ्यामाझ्यासारख्या तरुणांच्या जगात इतकी सुंदर चारुलता एकच आहे. प्रख्यात चित्रकार नंदलाल सारंग यांची एकुलती एक लाडकी मुलगी ! ओळखत नाहीस तू तिला ?' नंदूच्या विनोदी बोलण्याचं सूत्र धरून पुढे बोलल्याप्रमाणे मन्मथ म्हणाला, 'अरे, असा कोण तरुण आहे की जो चारुलतेला ओळखीत नाही ? तिचा परिचय करून घेण्यासाठी उत्सुक नाही ? तुझे वडील भाऊसाहेब नंदलालचे मित्र आहेत. तेव्हा तुझा आणि तिचा परिचय असावा हे साहजिकच आहे. मी मात्र या क्षणापर्यंत चारुलतेला दुरून पाहणारापैकी एक आहे. आता तिचा परिचय होण्याची पर्वणी आली आहे असं दिसतं. आज माझ्या पत्रिकेतले सारे शुभग्रह उच्चीचे असावेत. दुपारी मिष्टान्न भोजन झालं. रात्र केसरबाईचं सुंदर गाणं ऐकण्यात गेली, आणि आता चारुलतेची ओळखदेखील होणार, तिच्या सहवासाचा लाभ होणार !' ...नंदूनं त्याच्या पाठीत प्रेमाचा धपका घातला व तो म्हणाला, 'पहिल्याच दृष्टभेटीत हृदय गमावून बसू नकोस बेट्या...'

ज्या ठिकाणी नंदूनं आपली गाडी उभी केली होती तिथं दोघं गेले. गाडीत चढले. मन्मथनं गाडी सुरू केली... आणि हॉलच्या प्रवेशद्वारापाशी उभी केली... गाडीची वाट पाहात असल्याप्रमाणे चारुलता दारात उभी होती... दोघेही खाली उतरले. नंदूनं चारुलतेला म्हटलं, 'हा माझा मित्र मन्मथ कौशिक. फर्डं इंग्रजी लिहितो आणि बोलतोही. चॅम्पियनमध्ये उपसंपादक आहे...' 'तुमचा परिचय करून घेण्यात फार आनंद होतो.' असं म्हणता म्हणता ती नमस्कार करणार होती. पण तितक्यात मन्मथनं हस्तांदोलनासाठी हात पुढे केला तेव्हा किंचितही न घोटाळता तिनं आपला हात त्याच्या हाती दिला... असंच काहीतरी औपचारिक वाक्य मन्मथ बोलला. पण त्या वाक्याच्या पाठोपाठ तो म्हणाला, 'आजपर्यंत तुमच्याबद्दल खूप खूप ऐकलं आहे पण प्रत्यक्ष गाठीभेटीची पर्वणी आज येत आहे. मी फार आनंदात आहे...'



नंदूनं आवश्यक तितक्या आदबीनं चारुलतेला मागच्या सीटवर बसविलं. मग नंदू आणि मन्मथ पुढच्या जागी बसले... गाडी सुरू झाली...

गाडी हाकता हाकता मान मागे न वळविता नंदूनं विचारलं, 'काय चारुताई, कॉफी घ्यायची काय ?'

चारुलता म्हणाला, 'आत्ता ? अहो किती वाजलेत माहीत आहे का ? या वेळेला कॉफीचं दुकान कुठलं उघडं असायला ?'

मन्मथ थोडीशी मान वळून म्हणाला, 'रात्री अकराच्या ठोक्याला नाटकं बंद झाली पाहिजेत, चहाकॉफीची दुकानं बंद झाली पाहिजेत, असा हुकूम जारी करणाऱ्या मोरारजी देसाईंची राजवट तीस वर्षांनी मागं पडली की ! आता चालेल तितका वेळ हॉटेल उघडं ठेवता येतं !'

चारुलता म्हणाली, 'असं म्हणता होय ?' मन्मथचं बोलणं तिला आवडल्याप्रमाणे तिचा आवाज होता.

नंदूला बोलण्याचा चान्स न देता मन्मथ म्हणाला, 'पहाटेचे चार वाजून गेले आहेत खरे. पण भलताच उशीर झाला म्हणून दुकान बंद करण्याची काल रात्रीची वेळ टळली, पण आजच्या नव्या दिवसाची उघडण्याची वेळ झाली असंही म्हणता येईल.'

चारुलता हसली आणि म्हणाली, 'हे बरीक खरं हं.'

नंदू म्हणाला, 'सारांश काय, कुठेतरी कॉफीचं उघडं दुकान सापडेल.'

चारुलतेनं विचारलं, 'इतकी तल्लफ आली आहे काय तुम्हाला कॉफी पिण्याची?'

मन्मथ म्हणाला, 'अहो कॉफी प्यायची, हे केवळ निमित्त. खरी तल्लफ आहे ती तुमचा थोडा अधिक सहवास मिळविण्याची आणि गप्पा मारण्याची. होय ना रे नंदू?'

नंदू म्हणाला, 'उघड बोललास हे बरं झालं. ताक मागायला जायचं आणि भांडं लपवायचं असं हवंय कशाला ? मग काय चारुताई, बघू या एखादं दुकान उघडं असेल तर ?'

चारुतला म्हणाला, 'गप्पा मारण्याची लहर आली आहे एवढंच ना ? मग त्यासाठी दुकानात कशाला जायला हवंय ? आमच्या घरीच जाऊ या. उत्तम कॉफी देते आणि गप्पाही पोटभर मारता येतील. घ्या आमच्या घराकडेच गाडी.'